# देहू नगरपंचायत कार्यालय ता हवेली.जि. पुणे

**Email : vdodehu@gmail.com**

जा.क्र आस्था/७७८/२०२३-२४ दि. ३१/१०/२०२३

## तहकूब सर्वसाधारण सभा

याद्वारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची दि.३१/१०/२०२३ रोजीची होणारी सर्वसाधारण सभा तहकुब करण्यात आलेली असून, तहकुब सर्वसाधारण सभा वार बुधवार दि. ०१/११/२०२३ रोजी दुपारी १२:३० वाजता देहू नगरपंचायत कार्यालय सभागृहात होणार आहे. तरी सर्वांनी उपस्थित राहावे हि विनंती.

सौ.स्मिता चव्हाण
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

# देहू नगरपंचायत कार्यालय ता हवेली.जि. पुणे

**Email : vdodehu@gmail.com**

जा.क्र आस्था / ७५० / २०२३-२४ दि. १९/१०/२०२३

## सर्वसाधारण सभा

**नमुना 'अ' (नियम ३ पहा)**

याद्वारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा वार मंगळवार दिनांक ३१/१०/२०२३ रोजी दुपारी १२:३० वाजता नगरपंचायत कार्यालयात जोडपत्रात नमूद केलेले कामकाज चालवण्यासाठी बोलवण्यात येत आहे.

## नमूद 'अ' चे जोडपत्र .

**देहू नगरपंचायतीची मंगळवार दिनांक ३१ /१०/२०२३ रोजीचे सभेपुढील चालवायचे कामकाजचे विषय.**

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२) मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.

३)देहू नगरपंचायत हद्दीतील परंडवाल चौक येथील पुलाची रुंदी वाढविण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

४)देहू नगरपंचायत हद्दीतील जुना पालखी मार्ग कंद पाटील चौक (बायपास दक्षिण रोड) ते नगरपंचायत हद्द (काळोखे मळा रस्ता ) रस्ता करणे बाबत स्ट्रीट लाईट बसवणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५) देहू नगरपंचायत हद्दीतील जुना पालखी मार्ग ओढ्यावरील पुलाचे काम करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

६)देहू नगरपंचायत क्षेत्रातील पात्र व प्रमाणित दिव्यांग बांधवांना ५ टक्के तरतुदीनुसार प्रत्यक्ष आर्थिक लाभ DBT नुसार देणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

७)देहू नगरपंचायत मध्ये दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंमलबजावणी करणे बाबत शहर कार्यकारी समिती स्थापन करण्यास आणि अभियानाच्या सर्व घटकाची अंमलबजावणी करण्यासाठी चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

८)देहू नगरपंचायत मध्ये प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी ( PMSVA Nidhi ) योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी देहू शहर पथविक्रेता आत्मनिर्भर निधी अंमलबजावणी व व्यवस्थापन समिती स्थापन करून फेरीवाल्यांच्या सर्व सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना राबविण्यास चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

९)देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.३ मध्ये रेणुकामाता मित्र मंडळ ते संजय सोनवणे यांच्या घरापर्यंत रस्ता व ड्रेनेज लाईन करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

१०) देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.३ मध्ये विक्रम झोंबाडे ते अनिल जाधव यांच्या घरापर्यंत रस्ता व ड्रे लाईन करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

११) देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.३ मध्ये पंडित जाधव सर ते रमेश तेलंग घरकुल एरिया मध्ये पिण्या पाण्याची नविन लाईन टाकणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१२) अर्बन प्रायमरी हेल्थ सेंटर अंतगर्त विठ्ठलनगर, माळीनगर व वडाचा (भैरवनाथनगर ) या ठिकाणी जा उपलब्ध करून देणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१३) देहू नगरपंचायत हद्दीतील हातगाडीवरील खाद्यपदार्थ विक्रेते ,स्वीट्स मार्ट, हॉटिल यांवर नगरपंचायतीच्या वती तपासणी कारवाई करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१४) देहू नगरपंचायत वाहनतळ निविदा प्रक्रिया करताना पार्किंग फी निश्चित करणेबाबत चर्चा व विचार विनिम करून निर्णय घेणे.

१५) देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ७ मध्ये रामभाऊ कंद यांच्या घरापासून ते शेख यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे , ड्रेनेज करणे व एल टी व एच टी लाईन भूमिगत करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करू निर्णय घेणे.

१६) देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.७ मध्ये अजय कंद यांच्या घरापासून ते तथास्तू पॅरॉडाईज २ यांच्या पर्यं रस्ता कॉंक्रीटीकरण करणे, ड्रेनेज करणे व एल टी व एच टी लाईन भूमिगत करणेबाबत चर्चा व विचार विनिम करून निर्णय घेणे.

१७) देहू नगरपंचायत हद्दीतील खेळाडूंसाठी प्राप्त पत्रानुसार कबड्डी खेळासाठी ग्राउंड व मॅट उपलब्ध करून देणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१८) देहू नगरपंचायत हद्दीतील ब्रीज ला माझी वसुंधरा अंतगर्त रंगकाम करणे व सुशोभीकरण करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१९) देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.३ व ४ मधील ओपन गटार दुरुस्तीबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२०) देहू नगरपंचायत हद्दीतील व्हिजनटेक एंटरप्रायजेस कंपणी ते के.के एंटरप्रायजेस कंपनी पर्यंत रस्ता करणेबाब चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२१) देहू बायपास तळवडे शिव ते सी.पी.कंपनी नं.०२ पर्यंत रस्ता करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२२) स्वच्छ सर्वेक्षण २०२३-२०२४ करिता शहर समन्वयक म्हणून श्री.अक्षय रोकडे यांना नियुक्ती देणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२३) देहू नगरपंचायत कार्यलया साठी १ झेरॉक्स मशीन खरेदी करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२४) देहू शहरात यात्रा कालावधीमध्ये उपस्थित राहणारे लोकप्रतिनिधी शासकीय अधिकारी /कर्मचारी यांचे भोजन चहा-नाष्टा पाणी निवास कामी तसेच कार्यालय पातळीवरील आयोजित मिटिंग सभा या कालावधी मध्ये चहा-नाष्टा पाणी पुरवणे कामी निविदा काढणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२५) देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रं.१५. माळीनगर इथा काही भागात ड्रेनेजचे काम व काही भागात चेंबरचे काम करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे

Scanned with OKEN Scanner

२६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये सुशोभीकरण व बोधचिन्ह करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२७) दलित वस्ती सुधरणा योजने अंतगर्त प्रभाग क्र. ९ मधील चव्हाणनगर भाग २ मध्ये ट्रान्सफार्मरची क्षमता वाढवून नव्याने जास्त क्षमतेचे ट्रान्सफार्मर बसविणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२८) प्रभाग क्र.१७ मध्ये विठ्ठल विधाटे ते सिकंदर कलवले यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉन्क्रेट रस्ता करणेबावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२९) प्रभाग क्र.१७ मध्ये अहमद मिस्त्री ते गणेश सावंत यांच्या घरापासून ते कांबळे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणेबावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३०) प्रभाग क्र.१० मधील स्मशानभूमीमध्ये पायऱ्यांवरशेड बसवणे जाळ्या लावणे व गेट बसवणे बावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३१) प्रभाग क्र.१ मधील सद्गुरू सोसायटी,संत तुकाराम सोसायटी मध्ये ड्रेनेज लाईन करणेबावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३२) प्रभाग क्र.१२ मधील मागील सभेमध्ये विविध कामांचे ड्रेनेज,पिण्याच्या पाण्याची लाईन ई.कामाबाबत केलेल्या कार्यवाहीबावत चर्चा व विचार विनिमय करून लवकरात लवकर कामे मार्गी लावणे बाबत.

३३) संत तुकाराम महाराज देवस्थानकडे जाण्यासाठी प्रभाग क्र.११ व १२ मध्ये दिशादर्शक फलक लावणेतसेच आवश्यक ठिकणी कमानी उभारणेबावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३४) प्रभाग क्र.२ मध्ये आवश्यकतेनुसार भूमिगत ड्रेनेज लाईन टाकणेबावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३५) प्रभाग क्र.२ मधील रासाई नगर, माउली सोसायटी, शुभारंभ पार्क येथे अंडरग्राउंड LT /ST लाईन टाकणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३६) महिला व बालकल्याण विभागामार्फत ५०० महिलांकरता अरीवर्क (एम्ब्रॉयडरी) ब्लाऊज डिझाईन व स्टिचिंग प्रशिक्षण आयोजित करणेबावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३७) प्रभाग क्र.११ मधील फुटपाथ वरील ब्लॉक बदलुन नविन ब्लॉक बसवणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३८) प्रभाग क्र.६ मधील अग्निहोत्री सोसायटी जवळील वडाच्या झाडाच्या वाट्याचे सुशोभीकरण करणेबावत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३९) देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी येथील जलशुदधीकरण केंद्र येथे साहीत्य पुरवठा करणे व वार्षीक तत्वावर चालविणे या कामावाबत चर्चा व विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

४०) देहू नगरपंचायत हद्दीतील स्ट्रीट लाईट देखभाल दुरुस्ती करणे व आवश्यकतेनुसार साहीत्य पुरवठा करणे या कामाबावत चर्चा व विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

४१) देहू नगरपंचायत हद्दीतील मालमत्तांचे चतुर्थ कर आकारणी सन २०२३-२०२४ ते २०२५-२०२६ पर्यंत मुदतवाढ देणे बावत चर्चा व विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

४२) विविध ठिकाणी एल टी लाईन स्थंलातरीत व रुंपातरीत करणे या कामास मुदतवाढ देणेबावत चर्चा व विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

४३) देहू नगरपंचायत कार्यालयात आवश्यक साहीत्य खरेदी करणे कामी विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

४४) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक स्वमअ-२०२२/प्र.क्र.१२६/नवि ३४ दिनांक १५ सप्टेंबर २०२३ या शासन निर्णयावर मुख्यमंत्री सक्षम शहर स्पर्धा २०२३ बाबत चर्चा व विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

४५) देहू नगरपंचायत हद्दीत सन २०२३ -२४ करिता वार्षिक निविदा करणे कामी चर्चा व विचार विनिमय करू निर्णय घेणे.

४६) देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी येथील जलशुदधीकरण केंद्रच्या कामास मुदतवाढ देणे बाबत चर्चा विचार विनिमय करून निर्णय घेणे.

४७) देहू नगरपंचायत हद्दीतील पंप व मोटार वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे बाबत चर्चा व विचार विनिमय करू निर्णय घेणे.

४८) देहू नगरपंचायत आरोग्य विभागातील विविध कामास मुदतवाढ देणेबाबत चर्चा व विचार विनिमय कर निर्णय घेणे.

४९) देहू नगरपंचायत हद्दीत GI/CI/DI/HDPE Vइतर पाईप लाईन मटेरियल्स साहित्य लिकेज काढणे व त अनुषंगिक कामे करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५०) देहू नगरपंचायत हद्दीतील बोडकेवाडी येथील जलशुदधीकरण केंद्र देखभाल दुरुस्ती करणे बाबत चर्चा व विच विनिमय करून निर्णय घेणे.

५१) देहू नगरपंचायत कार्यालय मा.मुख्याधिकारी ,मा.नगरध्यक्षा ,व मा.उपनगराध्यक्षा यांचे दालनात फर्निचर इतर अनुषंगिक कामे करणे बाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५२) देहू नगरपंचायत हद्दीतील विद्युत तारांना चिकटलेली झाडे तोडण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करू निर्णय घेणे.

५३) देहू नगरपंचायत हद्दीत फटका स्टॉल लावणे व जागा निश्चित करणे बाबत चर्चा व विचार विनिमय करू निर्णय घेणे

देहू नगरपंचायत स्थापना सन २०२० देहू, जि. पुणे

सौ.स्मिता चव्हाण
नगराध्यक्षा
देहू नगरपंचायत,देहू

Scanned with OKEN Scanner

**मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

यांजकडे......

**तहकुब सर्वसाधारण सभा**
**दिनांक :- ०१/११/२०२३**

**विषय क्रमांक :- ०१**
**ठराव क्रमांक :- ०१**

**विषय क्र. १ :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.**

ठराव क्र. 1 :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. सदरचा विषयानुसार मागील सर्वसाधारण सभेमधील पारित झालेल्या ठरावावर विचार विनियम करण्यात आला. मागील सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करण्यात आले.

सूचक :- श्री. अदित्य चि. टिळेकर

अनुमोदक :- सौ. प्रियंका अ. मोरे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत
**सर्वसाधारण सभा दिनांक**

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

तहकुब सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३

विषय क्रमांक :- ०२
ठराव क्रमांक :- ०२

**विषय क्र. २ :- मा. सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास मंजूर करणे.**

ठराव क्र. 2 :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. कोणत्याही सदस्यांचे रजेचे अर्ज प्राप्त नाहीत.

सुचक :- सौ सपना ज मोरे

अनुमोदक :- सौ.पुजा सु. काळोखे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

त.सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३
विषय क्रमांक :- ३
ठराव क्र.३

**विषय– देहु नगरपंचायत हद्दीतील परंडवाल चौक येथील पुलांची रुंदी वाढविण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे .**

<u>ठराव</u>

सदरचा विषय में, सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला .देहू नगरपंचायत हद्दीतील परंडवाल चौक येथील पुलांची रुंदी वाढविणे गरजचे आहे. रस्ता अरुंद असल्यामुळे चाकण एम.आय.डी.सी मधून येणारी वाहने ,वाहनाची गर्दी परंडवाल चौकामध्ये होत आहे त्यामुळे ट्राफिकचे प्रमाण वाढत आहे. परंडवाल चौक पासून देहू नगरपंचायत हद्दीपर्यंत रस्ता रुंदीकरणची देखील आवश्कता आहे. सदर रस्ता हा अरुंद असल्यामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे पालखी मार्ग असल्यामुळे पालखी प्रस्थान दरम्यान देखील रस्ता अरुंद असल्यामुळे मोठ्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे परंडवाल चौक पुलाचे रुंदीकरण व परंडवाल चौक ते देहू नगरपंचायत हद्दीपर्यंत रस्ता हा प्रादेशिक योजनेत ६० मीटर रस्ता असून तुर्तास सदरचा रस्ता ३० मीटर प्रमाणे भुसंपादन करुन बाधित क्षेत्र धारकांना TDR / FSI स्वरुपात मोबदला देवून भूसंपादन कार्यवाही करणेस व रस्ता रुंदीकरण व पुल रुंदीकरण ही कामे वैशिष्टपुर्ण योजना अथवा ज्या शासन निधीतून निधी उपलब्ध होईल त्या निधी मधून काम करणेस ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

योगेश परंडवाल
सुचक

प्रविण काळोखे
अनुमोदक

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

त.सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३
विषय क्रमांक :- ३
ठराव क्र.३

**विषय— देहु नगरपंचायत हद्दीतील परंडवाल चौक येथील पुलांची रुंदी वाढविण्याबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे .**

## ठराव

सदरचा विषय में, सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला .देहू नगरपंचायत हद्दीतील परंडवाल चौक येथील पुलांची रुंदी वाढविणे गरजचे आहे. रस्ता अरुंद असल्यामुळे चाकण एम.आय.डी.सी मधून येणारी वाहने ,वाहनाची गर्दी परंडवाल चौकामध्ये होत आहे त्यामुळे ट्राफिकचे प्रमाण वाढत आहे. परंडवाल चौक पासून देहू नगरपंचायत हद्दीपर्यंत रस्ता रुंदीकरणची देखील आवश्कता आहे. सदर रस्ता हा अरुंद असल्यामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे पालखी मार्ग असल्यामुळे पालखी प्रस्थान दरम्यान देखील रस्ता अरुंद असल्यामुळे मोठ्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे परंडवाल चौक पुलाचे रुंदीकरण व परंडवाल चौक ते देहू नगरपंचायत हद्दीपर्यंत रस्ता हा प्रादेशिक योजनेत ६० मीटर रस्ता असून तुर्तास सदरचा रस्ता ३० मीटर प्रमाणे भुसंपादन करुन बाधित क्षेत्र धारकांना TDR / FSI स्वरुपात मोबदला देवून भूसंपादन कार्यवाही करणेस व रस्ता रुंदीकरण व पुल रुंदीकरण ही कामे वैशिष्टपुर्ण योजना अथवा ज्या शासन निधीतून निधी उपलब्ध होईल त्या निधी मधून काम करणेस ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

योगेश पंरडवाल
सुचक

प्रविण काळोखे
अनुमोदक

अध्यक्ष
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

त.सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३
विषय क्रमांक :- ०४
ठराव क्र. ०४

**देहु नगरपंचायत देहु**
ता हवेली जि. पुणे.

**विषय— देहू नगरपंचायत हद्दीतील जुना पालखी मार्ग कंद पाटील चौक (बायपास दक्षिण रोड) ते नगरपंचायत हद्द (काळोखे मळा रस्ता) रस्ता करणे बाबत स्ट्रीट लाईट बसविणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

<u>ठराव</u>

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत हद्दीतील जुना पालखी मार्ग कंद पाटील चौक (बायपास दक्षिण रोड) ते नगरपंचायत हद्द (काळोखे मळा रस्ता) रस्ता करणे बाबत स्ट्रीट लाईट बसविणे याकरिता तेथील नागरिकांनी स्थानीक नगरसेवक यांचेकडे तोंडी सुचनेद्वारे मागणी केली आहे. नागरिकांना सोयी-सुविधा देणे आवश्यक आहे त्यामुळे सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / वैशिष्टपुर्ण योजना या निधीतुन सदरचे काम करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

प्रविण काळोखे
सुचक

योगेश परंडवाल
अनुमोदक

अध्यक्षा
**देहु नगरपंचायत देहु**

Scanned with OKEN Scanner

त.सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३
विषय क्रमांक :- ५
ठराव क्र.५

**देहु नगरपंचायत देहु**
ता हवेली जि. पुणे.

**विषय— देहु नगरपंचायत हद्दीतील जुना पालखी मार्ग ओढ्यावरील पुलाचे काम करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे .**

**ठराव**

सदरचा विषय में, सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला .देहु नगरपंचायत हद्दीतील जुना पालखी मार्ग ओढ्यावरील पुलाचे काम करणे गरजचे आहे. रस्ता अरुंद असल्यामुळे व पुलाची उंची कमी असल्यामुळे पावसाळ्यात पुलावरून पाणी जाते त्यामुळे तेथील स्थानिक शेतकरी व रहिवाशी यांची गैरसोय होत असते त्या संदर्भात सदर तेथील नागरिकांनी सदर काम करणेबाबत स्थानीक नगरसेवक यांचेकडे वेळोवेळी मागणी केली आहे सदरचे काम करणे आवश्यक असल्याने हे काम शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / वैशिष्टपुर्ण योजना या निधीतुन सदरचे काम करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

प्रविण काळोखे
सुचक

योगेश परंडवाल
अनुमोदक

अध्यक्षा
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

तहकुब सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३

विषय क्रमांक :- ०६
ठराव क्रमांक :- ०६

विषय क्र. ०६ :- देहू नगरपंचायत क्षेत्रातील पात्र व प्रमाणित दिव्यांग बांधवांना ५% तरतुदीनुसार प्रत्यक्ष आर्थिक लाभ DBT नुसार देणेबाबत चर्चा व विचार विनियम करुन निर्णय घेणे.

ठराव 06 : सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत मध्ये 40 किंवा त्यापेक्षा अधिक प्रमाण असलेल्या प्रमाणित दिव्यांगांना दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 या अधिनियमानुसार दिव्यांग व्यक्तींना समान संधी व हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा प्रदान करण्यात आलेल्या समान संधी व हक्काच्या आधारे दिव्यांग व्यक्तींना सामाजिक, आर्थिक व स्व: उत्थानाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास तसेच सामान्य व्यक्तींप्रमाणे सुसह्य जीवन जगण्यासाठी योग्य अशा संधी उपलब्ध करुन देणेबाबतची तरतुद केली आहे.

सदरील अधिनियमानुसार 5 टक्के राखीव निधीमधून 2023-24 या चालू वर्षामध्ये आणि यापुढील प्रत्येक वर्षी दिवाळीपूर्वी पात्र व प्रमाणित दिव्यांगणा प्रति दिव्यांग प्रत्यक्ष अर्थित स्वरूपामध्ये डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर DBT दिव्यांग यांच्या बँक खात्यामध्ये निर्धारित रक्कम अदा करण्यास ही तहकुब सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे. दिव्यांगांना द्यावयाची आर्थिक स्वरूपाची रक्कम निश्चित करताना खालील प्रमाणे कार्यपद्धती वापरण्यास ही तहकुब सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे

मागील वर्षीच्या अर्थसंकल्पानुसार होणारी पाच टक्के रक्कम व यापूर्वी शिल्लक असणाऱ्या सेस नुसार ची रक्कम यानुसार होणाऱ्या एकूण रकमेच्या 50 टक्के रक्कम ही दिव्यांगांना सार्वजनिक प्रयोजनार्थ खर्च करावी तसेच उर्वरित 50 टक्के रक्कम दिव्यांगांना वैयक्तिक लाभाच्या स्वरूपात समान नित्य DBT द्वारे अदा करण्यात यावी. यानुसार देहू नगरपंचायत क्षेत्रातील पात्र व प्रमाणित दिव्यांगांना वैयक्तिक आणि सावजानक स्वरूपाच्या योजनेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ.पुजा सु. काळोखे.

अनुमोदक :- श्री.सुधिर सु. काळोखे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

तहकुब सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३

विषय क्रमांक :- ०७
ठराव क्रमांक :- ०७

विषय क्र. ०७ :- देहू नगरपंचायत मध्ये दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंमलबजावणी करणेबाबत शहर कार्यकारी समिती स्थापन करण्यास आणि अभियानाच्या सर्व घटकाची अंमलबजावणी करण्यासाठी चर्चा व विचार विनियम करुन निर्णय घेणे.

ठराव 07 : सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत मध्ये दीनदयाळ अंत्योदययोजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंमलबजावणी करणेचेआदेश प्राप्त झालेले आहेत. सदरील अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी खालील विविध घटकांचे काम सुरू करणे गरजेचे आहे.

1. सामाजिकअभिसरण व संस्थात्मक विकास (SMID)

2. कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता ( ESTP)

3. स्वयं रोजगार कार्यक्रम (SEP)

4. नागरी फेरीवाल्यांना सहाय्य ( SUSV)

5. नागरी बेघरांना निवारा (SUH)

6. क्षमता बांधणी आणि प्रशिक्षण ( CBT)

तसेच केंद्रशासनाच्या राष्ट्रीय नागरिक उपजीविका अभियानाबाबत मार्गदर्शक सूचनामध्ये अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता शहरस्तरावर शहरकार्यकारी समिती स्थापनकरावी असे सुचितकरण्यात आलेले आहे. सदरील शहर कार्यकारी समितीने दरमहा बैठक घेऊन अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता उपाययोजना करणे तसेच अभियानाच्या आर्थिक व भौतिक उद्दिष्ट पूर्ण होण्याच्या दृष्टीने आढावा घेणे, नियोजन करणे, पाठपुरावा करणे, मान्यता देणे इत्यादी अत्यावश्यक धोरणात्मक कामे सदरील शहर कार्यकारी समितीने करावयाची आहेत. दीनदयाळ अंत्योदययोजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाच्याअंमलबजावणी करिता शहरकार्यकारी समिती स्थापन करणेस प्रशासकीय प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री.आदित्य चि. टिळेकर.

अनुमोदक :- सौ.रसिका स्व. काळोखे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

**मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

यांजकडे......

**तहकुब सर्वसाधारण सभा**
**दिनांक :- ०१/११/२०२३**

**विषय क्रमांक :- ०८**
**ठराव क्रमांक :- ०८**

**विषय क्र. ०८ :- देहू नगरपंचायत मध्ये प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भय निधी (PMSVA Nidhi) योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी देहू शहर पथविक्रेता आत्मनिर्भर निधी अंमलबजावणी व व्यवस्थापन समिती स्थापन करून फेरीवाल्यांच्या सर्व सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना राबविण्यास चर्चा व विचार विनियम करुन निर्णय घेणे.**

ठराव ०८ : सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत मध्ये केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेची राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत शहरांमध्ये रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या सर्व पथविक्रेत्यांना राष्ट्रीयकृत बँकामार्फत दहा हजार रुपयाचे कर्ज उपलब्ध करून देण्याचा लाभ द्यावयाचा आहे.

नगर पथविक्रेते अनौपचारिक नागरी अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहेत.त्यांच्यामध्ये पुरविल्या जाणाऱ्या वस्तूमध्ये भाज्या, फळे, तयार खाद्यपदार्थ, चहा, भजी-पाव, अंडी, कापड- वस्त्र, चप्पल कारागीराद्वारे उत्पादित वस्तू,पुस्तके, स्टेशनरी इत्यादींचा समावेश होतो तर सेवेमध्ये उदाहरणार्थ केश कर्तणालय दुकाने,चर्मकार, पान दुकाने, कपडे धुण्याचे दुकाने, इत्यादींचा समावेश होतो. कोविड-19 साथीचा रोग सर्वत्र पसरला आणि परिणामी टाळेबंदी झाल्याने पथविक्रेत्यांच्या उपजीविकेवर विपरीत परिणाम झाल्यामुळे सदरील योजना सुरू करण्यात आलेली आहे. पथविक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरू करण्यासाठी खेळते भांडवलाचा पतपुरवठा तातडीने प्रदान करण्याची आवश्यकता आहे.

देहू नगरपंचायत मध्ये 2011 च्या ( 17475 ) लोकसंख्येनुसार एकूण लोकसंख्येच्या दोन टक्के असे निर्धारित पथविक्रेते असे उद्दिष्ट आहे त्या आधारे एकूण 350 असे उद्दिष्ट डिसेंबर 2024 पर्यंत देण्यात आले आहे. यानुसार देहू नगरपंचायत क्षेत्रात फेरीवाल्यांच्या सर्व सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना राबविण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ.प्रियंका अ. मोरे.

अनुमोदक :- सौ.शितल अ. हगवणे.

ठराव सर्वानुमते मंजूर

**नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत**
**सर्वसाधारण सभा दिनांक**

Scanned with OKEN Scanner

त.सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३
विषय क्रमांक :- ०९
ठराव क्र. ०९

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

**विषय— देहू नगरपंचायत प्रभाग क्र. 3 मध्ये रेणुकामाता मित्र मंडळ ते संजय सोनावणे यांच्या घरापर्यंत रस्ता व ड्रेनेज लाईन करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

<u>ठराव</u>

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत प्रभाग क्र.3 मध्ये रेणुकामाता मित्र मंडळ ते संजय सोनावणे यांच्या घरापर्यंत रस्ता व ड्रेनेज लाईन करणे व प्रभाग क्र ३ मधील विठ्ठलवाडी आभिषेक डोके यांच्या घरापासून ते अक्षय भुजबळ यांच्या घरा पर्यंत रस्ता करणे, प्रभाग क्र ३ मधील विठ्ठलवाडी अंगणवाडी ते विनोद चव्हाण यांच्या घरापर्यंत रस्ता करणे करिता तेथील नागरिकांनी स्थानीक नगरसेवक यांचेकडे तोंडी सुचनेद्वारे मागणी केली आहे. नागरिकांना सोयी-सुविधा देणे आवश्यक आहे त्यामुळे सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीततेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / १५ वित्त आयोग / अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना/ वैशिष्टपुर्ण योजना या निधीतुन सदरचे काम करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

मयुर शिवशरण
सुचक

पुजा दिवटे
अनुमोदक

अध्यक्षा
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

त.सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३
विषय क्रमांक :- १०
ठराव क्र. १०

**विषय– देहू नगरपंचायत प्रभाग क्र.3 मध्ये विक्रम झोंबाडे ते अनिल जाधव यांच्या घरापर्यंत रस्ता व ड्रेनेज लाईन करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**ठराव**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत प्रभाग क्र.3 मध्ये विक्रम झोंबाडे ते अनिल जाधव यांच्या घरापर्यंत रस्ता व ड्रेनेज लाईन करणे करिता तेथील नागरिकांनी सन्मानीय नगरसेवक यांचेकडे तोंडी सुचनेद्वारे मागणी केली आहे. नागरिकांना सोयी-सुविधा देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / साहित्यरत्न लोकशाहीर अणाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेतून करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

मयुर शिवशरण
सुचक

पुजा दिवटे
अनुमोदक

अध्यक्षा
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. तहकुब सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक - ११
दिनांक - ०१/११/२०२३

ठराव क्रमांक- ११
दिनांक -०१/११/२०२३

विषयाचे नाव- देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.३ मध्ये पंडित जाधव सर ते रमेश तेलंग घरकुल एरिया मध्ये पिण्याच्या पाण्याची नविन लाईन टाकणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू नगरपंचायत हद्दीचे विस्तारीकरण झाले असून लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहरात बऱ्याच भागात पाणीपुरवठा विस्कळीत असून नागरिकांच्या तक्रारी नगरपंचायत कडे येत आहेत. यात प्रामुख्याने प्रभाग क्र.३ मध्ये पंडित जाधव सर ते रमेश तेलंग घरकुल एरिया या भागातील तक्रारी जास्त असून सदर ठिकाणच्या पाईपलाईन करणे गरजेचे असून सदर ठिकाणच्या भागातील पाहणी करून मोजमाप घेऊन अंदाजपत्रक तयार करून घेण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस , निविदा मागवणेस व या कमी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मजुरी देत आहे .

सदर कामाचा खर्च नगरपंचायत फंडातून/ विविध शासकीय योजनेतून करण्यात यावा.

सूचक : श्री.सुधीर काळोखे

अनूमोदक : श्री. प्रवीण काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

स्मिता शै. चव्हाण
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

**मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

यांजकडे......

**तहकुब सर्वसाधारण सभा**
**दिनांक :- ०१/११/२०२३**

**विषय क्रमांक :- १२**
**ठराव क्रमांक :- १२**

**विषय क्र. १२ :- अर्बन प्रायमरी हेल्थ सेंटर अंतर्गत विठ्ठलनगर, माळवाडी व वडाचा (भैरवनाथनगर) या ठिकाणी जागा उपलब्ध करून देणेबाबत चर्चा व विचार नियम करून निर्णय घेणे.**

ठराव 12 . सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायतीची अर्बन प्रायमरी हेल्थ सेंटर यांनी विठ्ठलनगर, माळीनगर व वडाचामाळ (भैरवनाथ नगर) या ठिकाणी हेल्थ सेंटर उभारण्यासाठी जागा मागणी केलेली आहे. परंतु सदर ठिकाणी देहू नगरपंचायत मालकीची जागा नसल्याने जागा देता येणार नाही जर कोणी खाजगी जागा मालकाने निशुल्क जागा उपलब्ध करुन दिल्यास व अर्बन प्रायमरी हेल्थ सेंटर सुरु करण्यास काहीही हरकत नाही.

सदर हेल्थ सेंटर सुरु करताना ते कशा स्वरुपाचे असणार आहे व त्यापासून नागरिकांना काय लाभ मिळणार आहे याची सविस्तर माहिती घेण्यात यावी. अशा स्वरुपाची चर्चा होऊन त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आले आहे.

सुचक :- श्री.योगेश ह. काळोखे

अनुमोदक :- श्री.प्रविण रा. काळोखे.

ठराव सर्वानुमते मंजूर

**नगराध्यक्षा,देहू नगरपंचायत**
**सर्वसाधारण सभा दिनांक**

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. तहकुब सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक - १३
दिनांक - ०१/११/२०२३

ठराव क्रमांक- १३
दिनांक -०१/११/२०२३

विषयाचे नाव- देहू नगरपंचायत हद्दीतील हातगाडीवरील खाद्यपदार्थ विक्रेते, स्वीट मार्ट, हॉटेल यांवर नरगपंचायतीच्या वतीने तपासणी कारवाई करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू नगरपंचायत हद्दीतील हातगाडीवरील खाद्यपदार्थ विक्रेते, स्वीट मार्ट, हॉटेल यांवर नरगपंचायतीच्या वतीने तपासणी कारवाई करणेबाबत मा. सभासद यांनी सुचना दिल्या परंतु मा.मुख्याधिकारी यांनी सभागृहास खाद्यपदार्थ विक्रेते, स्वीट मार्ट, हॉटेल यांवर तपासणी कारवाई खाद्य विभाग यांच्या मार्फत कारवाई केली जाते अशी माहिती दिली. मा. मुख्याधिकारी यांनी यापुढील अश्या विक्रेत्यांना ना हरकत देत असताना सदरील संभदीत विभागांची ना हरकत नसेल तरच परवानगी देण्यात येईल असे सभागुहात सांगितले.

सूचक : योगेश ह. काळोखें

अनूमोदक : मयुर द.शिवशरण

ठराव सर्वानुमते मंजूर

स्मिता शे. चव्हाण
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

तहकुब सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३

विषय क्रमांक :- १४
ठराव क्रमांक :- १४

विषय क्र. १४ :- देहू नगरपंचायत वाहनतळ निविदा प्रक्रिया करताना पार्किंग फी निश्चित करणेबाबत चर्चा व विचार विनियम करून निर्णय घेणे.

ठराव 14 : सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायतीची नोंदणीकृत वाहनतळ जागा निश्चित नाही तथापी देहू नगरपंचायत मार्फत सदयास्थितीत चौदाटाळकरी कमान (डॉ.बाबसाहेब आंबेडकर चौक) ते गाथा मंदिर पर्यंत रस्त्यांच्या दुतर्फी पार्किंग केलेल्या यात्रेकरांच्या वहानांसाठी रक्कम रुपये 40/- प्रमाणे पार्किंग वसुली करण्यात येत आहे.

देहू शहरामध्ये वर्षामध्ये श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळा, आषाढी वारी पालखी प्रस्थान सोहळा, कार्तिकी यात्रा या तीन मोठया यात्रा भरत असुन लाखो भाविक राज्यातुन व परराज्यातुन वहाने घेवून येत असतात तसेच यात्रे व्यतिरिक्त देहू शहरामध्ये येणाऱ्या मोठया प्रमाणातील दैनंदिन यात्रेकरुंची संख्या हि मोठया प्रमाणात असून यात्रेकरू गाडया घेऊन देहू शहरात येत असतात. शहरामध्ये दाखल होणाऱ्या यात्रेकरुंना मुलभुत सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी देहू नगरपंचायतीची आहे. त्यामुळे याचा संपुर्ण आर्थिक तान हा देहू नगरपंचायतीवर येत असतो.येणाऱ्या यात्रेकरुंनच्या गाडयान पासुन देहू नगरपंचायतीला मिळणारे उत्पन हे खुपच कमी आहे. देहू नगरपंचायाती मार्फत निविदा प्रक्रिया करताना यात्रे करुंनच्या गाडयांचे पार्किंग दर वाढविल्यास नगरपंचायातीचे आर्थिक उत्पन्नात वाढ होऊन येणाऱ्या भाविकांना व यात्रेकरांना चांगल्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य आहे.

मुख्याधिकारी, देहू नगरपंचायत यांचा अहवाल पहाता शहरात दाखल होणाऱ्या यात्रेकरुंना आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने नगरपंचायतीचे उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे त्याकारिता खालील प्रमाणे यात्रेकरुंच्या वहानांकरिता व शुल्क आकारणीस दर लागु करण्यास खालील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

**निश्चित केलेली ठिकाणे :-**

1. देहू – देहूरोड मुख्य रस्ता मुख्य कमान ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक दुतर्फा
2. प्रा. आ. केंद्र व मागील बाजु दुतर्फा
3. डॉ.बाबसाहेब आंबेडकर चौक ते गाथा मंदिर पर्यंत दुतर्फा
4. मुख्य मंदिरपरिसरातील सर्व रस्ते दुतर्फा
5. बाहय वळन रस्ता 1,1,2.

**वहानांचे दर :-**

1. ट्रॅव्हल बस – रु.200/-
2. मिनी बस /टॅम्पो ट्रक – रु.150/-
3. जिभ / कार – रु. 50/-
4. टुव्हिलर पार्किंग – रु. 10/-

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

त.सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३
विषय क्रमांक :- १५
ठराव क्र. १५

**विषय— देहू नगरपंचायत प्रभाग क्र.७ मध्ये रामभाऊ कंद यांच्या घरापासून ते शेख यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे, ड्रेनेज लाईन व एल टी व एच टी लाईन भूमिगत करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत प्रभाग क्र. ७ मध्ये रामभाऊ कंद यांच्या घरापासून ते शेख यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे, ड्रेनेज लाईन व एल टी व एच टी लाईन भूमिगत करणे करिता तेथील नागरिकांनी सन्मानीय नगरसेवक यांचेकडे तोंडी सुचनेद्वारे मागणी केली आहे. तेथील नागरिकांना सोयी-सुविधा देणे आवश्यक आहे त्यामुळे सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) या निधीतुन सदरचे काम करणेस ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

योगेश काळोखे
सुचक

योगेश परंडवाल
अनुमोदक

अध्यक्षा
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

त.सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३
विषय क्रमांक :- १६
ठराव क्र. १६

**विषय— देहू नगरपंचायत प्रभाग क्र.७ मध्ये अजय कंद यांच्या घरापासून ते तथास्तू पँरॉडाईज यांच्या पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे, ड्रेनेज लाईन व एल टी व एच टी लाईन भूमिगत करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**ठराव**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत प्रभाग क्र. ७ मध्ये अजय कंद यांच्या घरापासून ते तथास्तू पँरॉडाईज यांच्यापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे, ड्रेनेज लाईन व एल टी व एच टी लाईन भूमिगत करणे करिता तेथील नागरिकांनी स्थानीक नगरसेवक यांचेकडे तोंडी सुचनेद्वारे मागणी केली आहे. तेथील नागरिकांना सोयी-सुविधा देणे आवश्यक आहे त्यामुळे सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / वैशिष्टपुर्ण योजना या योजनेतून सदरचे काम हाती घेणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

योगेश काळोखे
सुचक

योगेश परंडवाल
अनुमोदक

अध्यक्षा
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

त.सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३
विषय क्रमांक :- १७
ठराव क्र. १७

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

**विषय— देहू नगरपंचायत हद्दीतील खेळाडूसाठी प्राप्त पत्रानुसार कबड्डी खेळासाठी ग्राऊंड व मॅट उपलब्ध करुन देणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत कबड्डी खेळासाठी ग्राऊंड व मॅट उपलब्ध करुन देणेकरीता सन्मानीय नगरसेवक यांनी मागणी केली आहे. नागरिकांना सोयी-सुविधा देणे आवश्यक आहे त्यामुळे सदरचे कामाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा व उपलब्ध होईल त्या निधीतून तसेच शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / वैशिष्टपुर्ण योजना या योजनेतून सदरचे काम हाती घेणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

योगेश काळोखे
सुचक

योगेश परंडवाल
अनुमोदक

अध्यक्षा
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. तहकुब सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक - १८
दिनांक - ०१/११/२०२३

ठराव क्रमांक- १८
दिनांक -०१/११/२०२३

विषयाचे नाव- देहू नगरपंचायत हद्दीतील ब्रीज ला माझी वसुंधरा अंतर्गत रंगकाम करणे व सुशोभीकरण करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू शहर हे महाराष्ट्रातील नामांकित तीर्थक्षेत्रांपेकी एक शहर असून भाविक भक्त लाखोंच्या संख्येने देहू शहरात येत असतात, अश्यात देहू नगरपंचायतने स्वच्छ सर्वेक्षण वर लक्ष केंद्रित केल्यास देहू शहराचा विकास चांगल्या गतीने होण्यास मदत होणार आहे. देहू नगरपंचायतच्या मार्गदर्शनाप्रमाणे सन २०२३-२४ माझी वसुंधरा अभियान व स्वच्छ सर्वेक्षण अभियान अंतर्गत नगरपंचायतीस प्राप्त झालेल्या टूलकिट नुसार तसेच केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या आदेश व निर्देशनानुसार राज्य व राष्ट्रीय स्तरावर उच्च व चांगले मानांकन प्राप्त करण्यासाठी व भरीव कामगिरी करण्यासाठी तसेच कचरामुक्त शहराचे तारांकित मानांकन या स्पर्धात्मक अभियानामध्ये सर्वोत्तम कामगिरी करण्याच्या अनुषंगाने शहरातील शहरातील सर्व ब्रीजला रंगकाम करणे व सुशोभीकरण करणे आवश्यक असून सदर ठिकाणच्या भागातील पाहणी करून मोजमाप घेऊन अंदाजपत्रक तयार करून घेण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सदर अंदाज पत्रकास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजुरी घेणेस,निविदा मागवणेस व या कमी येणाऱ्या सर्व अनुषांगीक खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सदर कामाचा खर्च नगरपंचायत फंडातून/ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोस्थान अभियान/राज्य स्तर/जिल्हा स्तर/ १५ वित्त आयोग/विशेष वैशिष्ठपूर्ण योजना/ न.पा.फंड/ विकास निधी/ नागरी दलित्तेतर/स्वच्छ भारत मिशन अंतर्गत येणाऱ्या निधीतुन यातुन करण्यात यावा.

सूचक : श्री.सुधीर काळोखे

अनूमोदक : श्री. प्रवीण काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

स्मिता श. चव्हाण
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

त.सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३
विषय क्रमांक :- १९
ठराव क्र. १९

**विषय— देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ३ व ४ मधील ओपन गटार दुरुस्तीबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**ठराव**

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की देहू नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. ३ व ४ मधील ओपन गटार दुरुस्ती गरजेचे आहे. या ठिकाणी पावसाळ्याचे पाण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे सदर ठिकाणी पाण्याचा प्रवाह जास्त प्रमाणात असल्यामुळे लोकांच्या घरात पाणी जाण्याची शक्याता असते तसेच पावसाचे पाणी मोठया प्रमाणात असल्यामुळे रोगराई होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे सदर ठिकाणी ओपन गटार/भुमिगत गटर दुरुस्ती करणे आवश्यक असून सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीतेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

मयुर शिवशरण
सुचक

पुजा दिवटे
अनुमोदक

अध्यक्षा
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

त.सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३
विषय क्रमांक :- २०
ठराव क्र. २०

**विषय— देहू नगरपंचायत हद्दीतील व्हिजनटेक एंटरप्रायजेस ते के के एंटरप्रायजेस कंपनी रस्ता करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत हद्दीतील व्हिजनटेक एंटरप्रायजेस ते के के एंटरप्रायजेस कंपनी रस्ता करणे आवश्यक आहे याकरिता तेथील कंपनीधारक व नागरिकांनी सन्मानीय नगरसेवक यांचेकडे तोंडी सुचनेद्वारे मागणी केली आहे. नागरिकांना व स्थानिक कंपनी धारकांना सोयी-सुविधा देणे आवश्यक आहे त्यामुळे सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना या निधीतुन करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

मयुर शिवशरण
सुचक

पुजा दिवटे
अनुमोदक

अध्यक्षा
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहु नगरपंचायत देहु
ता हवेली जि. पुणे.

त.सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३
विषय क्रमांक :- २१
ठराव क्र. 21

**विषय— देहू बायपास तळवडे शिव ते सी.पी.कंपनी नं 02 पर्यंत रस्ता करणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव

सदर विषयाबाबत सभागृहात चर्चा करणेत आली व सर्वानुमते असे ठरविणेत आले की, देहू नगरपंचायत हद्दीतील देहू बायपास तळवडे शिव ते सी.पी.कंपनी नं 02 पर्यंत रस्ता करणे आवश्यक आहे याकरिता तेथील कंपनीधारक व नागरिकांनी सन्मानीय नगरसेवक यांचेकडे तोंडी सुचनेद्वारे मागणी केली आहे. नागरिकांना व स्थानिक कंपनी धारकांना सोयी-सुविधा देणे आवश्यक आहे त्यामुळे सदरचे काम हे शासनाच्या योजनेतून (जिल्हा नगरोत्थान योजना / दलीत्तेतर योजना / विशेष वैशिष्ट्यपूर्ण योजना / विशेष रस्ता अनुदान) / साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना या योजनेतून सदरचे काम करणेस या ठरावान्वये या कामी येणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

मयुर शिवशरण
सुचक

पुजा दिवटे
अनुमोदक

अध्यक्षा
देहु नगरपंचायत देहु

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत
मा. तहकुब सर्वसाधारण सभा

विषय क्रमांक - 22
ठराव क्रमांक- 22 दिनांक - 01/11/2023
दिनांक -01/11/2023

विषयाचे नाव- स्वच्छ सर्वेक्षण 2023-2024 करिता शहर समन्वयक म्हणून श्री.अक्षय रोकडे यांना नियुक्ती देणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

देहू नगरपंचायत करिता स्वच्छ सर्वेक्षण 2022-2023 करिता शहर समन्वयक म्हणून श्री अक्षय रोकडे यांची नियुक्ती दि.1 डिसेंबर 2022 रोजी 11 महिन्यांकरिता करण्यात आली होती. तरी सदरील नियुक्तीचा आदेश दि.31 ऑक्टोबर 2023 रोजी समाप्त होत असल्याने व तसेच स्वच्छ सर्वेक्षण 2023-2024, माझी वसुंधरा 4.0, शासनास वेळोवेळी लागणारी ऑनलाईन माहिती भरणे, तसेच मा.शासनाच्या आदेशाने पारित होणारी नवीन कामे करणे गरजेचे असून श्री.अक्षय रोकडे यांना देहू नगरपंचायत शहर समन्वयक म्हणून नियुक्ती देण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. .

सदर कामाचा खर्च नगरपंचायत फंडातून/ विविध शासकीय योजनेतून करण्यात

सूचक : श्री.सुधीर काळोखे
अनुमोदक : श्री. प्रवीण काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

स्मिता शै. चव्हाण
अध्यक्ष
देहू नगरपंचायत

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा.अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

तहकुब सर्वसाधारण सभा — विषय क्रमांक :- 23

दिनांक :- 01/11/2023 — ठराव क्रमांक :- 23

विषय क्र. 23 :- देहू नगरपंचायत कार्यालयासाठी 1 झेरॉक्स मशीन खरेदी करणेबाबत चर्चा विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. 23 :- सदर विषय मै. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायतचे दैनंदिन कार्यालयीन कामकाजासाठी नगरपंचायतचे अभिलेखातील उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या फोटोकॉपीची वेळोवेळी आवश्यकता भासते, तसेच नगरपंचायत मार्फत प्रस्तावित करण्यात येणा-या विकास कामांचे प्रस्ताव, शासकिय विविध अनुदान मागणी प्रस्ताव, विविध शासकिय कार्यालयास पाठविण्यात येत असलेली आवश्यक माहिती, सभा कामकाजाचे प्रोसिडींग, माहिती अधिकार अधिनियम २००५, लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत प्राप्त अर्जावर उपलब्ध करून द्यावयाची अभिलेखातील कागदपत्रे, नागरिकांना पुरविण्यात येणा-या विविध सेवांसाठी उपलब्ध करून द्यावयाचे अभिलेख, दैनंदिन कामकाजामध्ये लागणा-या कागदपत्राच्या फाटाकॉपी इ. कामकाजासाठी नगरपंचायतीचे विविध विभागांकरिता वेळोवेळी अभिलेखांच्या प्रतीच्या फोटोकॉपींची आवश्यक लागते त्यामुळे नगरपंचायतीचे कार्यालयीन कामकाजाकरिता एक झेरॉक्स मशीन खरेदी करणे आवश्यक असून त्यामुळे नगरपंचायतचे दैनंदिन कामकाज सुरळित रहाणेस मदत होणार असून प्रशासकिय कामकाजामध्ये सुलभता येणार आहे. सबब झेरॉक्स मशीन खरेदीविषयक निविदा प्रक्रिया राबवून खरेदी केरण अथवा मा.शासनाचे जी.एम पोर्टलव्दारे उपलब्धतेनुसार खेरेदी करणे या प्रक्रियेमधील सुविधाजनक प्रक्रिया राबवून नगरपंचायतचे निधीमधून एक झेरॉक्स मशीन खरेदी करणेस या ठरावाव्दारे प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणेत येत आहे.

सुचक :- श्री.योगेश बा. परंडवाल. — अनुमोदक :- सौ.पुजा सु. काळोखे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे......

तहकुब सर्वसाधारण सभा
दिनांक :- ०१/११/२०२३

विषय क्रमांक :- २४
ठराव क्रमांक :- २४

विषय क्र. २४ :- देहू शहरात यात्रा कालावधीमध्ये उपस्थित राहणारे लोकप्रतिनिधी शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे भोजन चहा-नाष्टा पाणी निवास कामी तसेच कार्यालय पातळीवरील आयोजित मिटिंग सभा या कालावधी मध्ये चहा-नाष्टा पाणी पुरवणे कामी निविदा काढणेबाबत चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेणे.

